# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.३५५५/२०२६

श्री .जगदिश चाकुभाई मिस्त्री,
27, श्रीनिवास, 2 रा मजला,
दुसरी लाईन, व्ही.पी. रोड, मुंबई-400008

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
गिरगांव विभाग, मुंबई-४००००७

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
दक्षिण परिमंडळ-2, मुंबई यांचे कार्यालय, सर जे. जे. मार्ग,
दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत/एटीएस बिल्डिंग कंपाउंड,
नागपाडा, मुंबई-४००००८

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०४.२०२६ | १५.०५.२०२६ | २२.०५.२०२६ | ३०.०६.२०२६ |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक १६/०४/२०२६ रोजीच्या **जोडपत्र अ** नुसार सहाय्यक पोलीस आयुक्त, गिरगाव डिव्हिजन यांच्याकडे दिनांक ३०/०१/२०२६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेली कार्यवाही याबाबत माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक १५/०५/२०२६ रोजी अपिलार्थींना मागितलेली माहिती ही **कलम ११ (१)** अन्वये त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने देण्यास नकार दिलेला आहे. या संदर्भात अर्जदार यांनी मागणी केलेल्या गैर अर्जदार श्रीमती नंदिनी रायपूरकर व बिल्डर श्री.भूपेश जैन यांच्याकडे सदर तक्रार अर्ज संदर्भात चौकशी करण्यात आली असून सदर प्रकरण हे दिवाणी स्वरूपाचे असल्याने तसेच **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ यातील कलम ११** अन्वये अर्जदार यांना माहिती देण्यास त्यांनी ठाम नकार दिला असल्याचे नमूद करीत संबंधित तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असून अहवाल साक्षांकित छायांकित प्रत या सोबत जोडण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. याविरुद्ध अपिलार्थीनी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून श्री.भूपेश जैन यांच्या जवाबाची प्रत तसेच केलेल्या संपूर्ण तपासाचा तपशील अपिलार्थीना देण्यात यावा असे नमूद केले आहे. यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा

पोलीस उपायुक्त दक्षिण परिमंडळ-२ यांनी दिनांक ३०/०६/२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशात जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचे नमूद करीत माहिती अधिकार अर्जामध्ये मागितलेली माहिती ही पुरविण्यात आली असल्याचा निष्कर्ष नोंदवित अपील अर्ज निकाली काढलेला आहे. त्याविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दिनांक २०/०७/२०२६ रोजी अपिलार्थी जे वरिष्ठ नागरिक आहेत यांनी दाखल केला असून ते ज्येष्ठ नागरिक असल्याने वरील सुनावणीस प्राधान्य देण्यात आलेले आहे.

अपिलार्थीनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ जोडपत्रामध्ये त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील तसेच बिल्डर श्री.भूपेश जैन यांच्या जवाबाच्या प्रती मागितल्या असून झालेल्या चौकशीचा संपूर्ण निष्कर्ष हा अपिलार्थीना पुरविलेल्या अहवालात या आधीच उधृत केलेला असून संबंधित बिल्डर यांचा जबाब देखील घेण्यात आला नसल्यामुळे तो अपिलार्थीना पुरविण्यात आलेल्या दस्तऐवजाचा भाग नसल्याचे विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी आज सुनावणी दरम्यान नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता अपिलीय अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची कुठलीही आवश्यकता आढळून येत नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल क्र.३५५५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २१.०९.२०२६**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.06 17:03:58 +05'30'